# प्रेस नोट

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर
दिनांक - २०/११/२०१७

## वानवडी पोलीसांकडुन सराईत गुन्हेगारांना पकडुन घरफोडी व वाहन चोरीच्या गुन्ह्यांची उकल

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी वानवडी पोलीस ठाणेकडील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नामे (१) तिलकसिंग गब्बरसिंग टाक वय २४ वर्षे रा.सर्वे नंबर १०८, १०९ आनंदनगर रामटेकडी हडपसर पुणे व त्याचे साथीदार नामे (२) विशाल राजु सोनवणे वय २२ वर्षे रा.गल्ली नंबर ३ अतीश लोंढे यांचे घरात कृष्णानगर महंमदवाडी पुणे मुळ गाव इंदापुर रोड जवाहरनगर अमराई ढोरगल्ली बारामती जि.पुणे (३) आदिनाथ ऊर्फ अजिनाथ लक्ष्मण गायकवाड वय २१ वर्षे रा.गल्ली नंबर २७ वडारवस्ती कृष्णानगर महंमदवाडी पुणे व एक विधी संघर्ष बालक यांचेकडुन **वानवडी पोलीस ठाणेकडील ०२ घरफोडी, व मार्केटयार्ड पोलीस ठाणेकडील ०१ वाहन चोरी, असे एकुण ०३ गुन्हे** उघडकीस आणले आहेत.

तसेच आरोपी नामे (१) आप्पा ऊर्फ सत्यवान श्रीमंत घाडगे वय २१ वर्षे धंदा ड्रायव्हर रा.वाघेश्वरनगर गोरे वस्ती रोड गणपती मंदीरा शेजारी वाघोली ता.हवेली जि.पुणे (२) आकाश गणपत माने वय २० वर्षे धंदा ड्रायव्हर रा.लाडबा वस्ती सावळाराम गभाले यांचे घरी केसनंद वाघोली ता.हवेली जि.पुणे मुळ गाव संजयनगर शेनोली रेल्वे स्टेशन शेजारी ता.कऱ्हाड जि.सातारा यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन **वानवडी पोलीस ठाणेकडील ०१ वाहन चोरी, हडपसर पोलीस ठाणेकडील ०१ वाहन चोरी, विमानतळ पोलीस ठाणेकडील ०१ वाहन चोरी व होंडा ॲक्टीवा चोरी तिचा तपास चालु आहे. असे एकुण ०३ गुन्हे** उघडकीस आणले आहेत.

वानवडी पोलीस ठाणेकडील पो.शि.नासीर देशमुख यांना विश्वसनीय माहीती मिळाली की, पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे तिलकसिंग गब्बरसिंग टाक व वरील इतर गुन्हेगारांना पकडुन त्यांचेकडे केलेल्या तपासात त्यांनी वरीलप्रमाणे गुन्हे केल्याचे कबुल केले असुन तसे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच त्यांनी वरील वेगवेगळ्या दाखल गुन्ह्यातील **५,७०,०००/- रुपये किमतीची वाहने व ७५,४००/- रुपये किमतीचे सोन्याचे दागीने व इतर वस्तु असा एकुण ६,४५,४००/- (सहा लाख पंचेचाळीस हजार चारशे रुपये)** किमतीचा एकुण मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे सो, परिमंडळ-४ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री निलेश मोरे सो, वानवडी विभाग पुणे शहर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सयाजी गवारे सो, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री ऊमेश तावसकर, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, श्री अजय म्हेत्रे, पो.हवा.रमेश भोसले, पो.ना.निसार खान, पो.ना.ज्ञानेश्वर गिरमकर, पो.ना.युवराज दुधाळ, पो.ना.सुदर्शन बोरावके, पो.शि.योगेश गायकवाड, पो.शि.शिरीष गोसावी, पो.शि.कानिफनाथ कारखेले, पो.शि.नासीर देशमुख, पो.शि.कैलास माळकर, पो.शि.अनुप सांगळे यांच्या पथकाने केली.